सन मध्ये १८-२०१७राज्यातील अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी १३ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त अनुदानामधून आवश्यक ती यंत्रसामुग्री व उपकरणे खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा -०३१८/प्र.क्र.१३३ /आ -७
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई ४०००01.
दिनांक : ३१ मार्च, २०१८.

वाचा :-

१) शासन पत्र, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.पीएचडी-३००११/प्र.क्र१०८/२०१३ (भाग-२)/ आ-७, दिनांक १६/०३/२०१७.

२) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.राआसोम/आरसीएच/कृती आराखडा/९०४७४९/१७, दिनांक ०२/०५/२०१७.

प्रस्तावना :-

राज्य शासन राज्यातील नवजात अर्भकांवर परिणामकारक योग्य ते उपचार करीत असल्यामूळे राज्यातील अर्भक मृत्यूदर कमी झालेला आहे. त्यामुळे केंद्र शासनाने १३ व्या वित्त आयोगामध्ये राज्य शासनास अर्भक मृत्यू दर कमी करण्यासाठी रु.३६७.६० कोटी इतकी प्रोत्साहनात्मक रक्कम मंजूर केलेली आहे. सदर निधीचा विनियोग करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समितीची बैठक मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३/१२/२०१४ रोजी नागपूर येथे पार पडली. सदर बैठकीमध्ये केंद्र शासनाकडून वरील प्राप्त निधीच्या विनियोगाबाबतच्या कृती आराखडयास मंजूरी देण्यात आली. सदर कृती आराखडयानुसार दिनांक १६/०३/२०१७ रोजीच्या शासन पत्रान्वये अर्भक मृत्यूदर कमी करण्याच्या अनुषंगाने मंजूर अनुदानातून आवश्यक ती यंत्रसामुग्री व उपकरणांची खरेदी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने सदर यंत्रसामुग्री व उपकरणे खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ मध्ये राज्यातील अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी १३ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त अनुदानामधून खालील प्रपत्रामध्ये नमूद केलेली यंत्रसामुग्री व उपकरणे खरेदी करण्यासाठी रु.३९३८.६९ लक्ष (रुपये एकोणचाळीस कोटी अडतीस लक्ष एकोणसत्तर हजार फक्त) एवढया निधीच्या निविदा प्रक्रिया राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

प्रपत्र- अ

अ. क्र.	सुधारित आराखडयातील अनुक्रमांक	घटक व तपशिल	रक्कमलक्ष /
1	2.b	Establishment of New SNCU equipment	16.00
2	2.b.2		48.00
3	4a	Upgradation of 16 SNCUs to NICU-CPAP	35.00
4	4.b.1	Upgradation of 16 SNCUs to NICU- Neonatal ventilator	160.00
5	4.b.2	Upgradation of 16 SNCUs to NICU- Neonatal ventilator	105.00
6	4c	Upgradation of 16 SNCUs to NICU- Diagnostics services	140.00
7	5a	Neonatal Stablilization Unit – Rediant Warmer	212.85
8	5b	Neonatal Stabilization Unit- Phototherapy Unit	107.00
9	5c	Neonatal Stabilization Unit – Pulse oxymeter with neonatal probe	164.90
10	13c	Renovation of Labor Room- Civil works to prepare mattress and small articles for comfort of mother	1015.47
11	13d	Renovation of Labor Room – Civil works to prepare Hospital Furniture in predelivery and LR	1015.47
१२		Solar photo voltaic system	734.00
13		Expanding Cold Chain Facility at State Vaccine Store (Walk-in-Cooler)	105.00
14		Refrigerated Vaccine van	80.00
		Total	3938.69

२. उपरोक्त प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

१) सदर साहित्य सामुग्रीची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदरहू साहित्य सामुग्रीचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने

तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच याबाबींची खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रस्तुत निवीदा प्रक्रीया राबवून खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) परिच्छेद क्र.२ मधील विवरणपत्रामध्ये नमूद साधनसामग्री /औषधांची प्रस्तावित खरेदी ही राष्ट्रीय आरोग्य अभियान-कार्यक्रम अंमलबजावणी आराखडा (PIP) अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अनुदानातून खर्च करण्यात यावी.

८) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

११) खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.

१२) प्रस्तुत प्रकरणी किती निधीची औषधांची खरेदी करण्यात आली तसेच किती साधनसामग्री खरेदी करण्यात आली व त्याचा कोणत्या जिल्हयांना व किती पुरवठा करण्यात आला,याची माहीती शासनास सादर करण्यात यावी.

३. उपरोक्त अनुक्रमांक १ ते १२ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय व कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु क्रमांक ४, नियम क्र. ७ अन्वये अवजारे, किरकोळ साधन सामग्री आणि उपक्रम संच विकत घेण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासनिक विभागास पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३१२११३३७७४१७ असा आहे. हा शासन निर्णय आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amol Nilakanth Sakharkar

Digitally signed by Amol Nilakanth Sakharkar
DN: CN = Amol Nilakanth Sakharkar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Agriculture Animal Husbandry dairy and Fisheries Department
Date: 2018.04.05 10:45:25 +05'30'

(अ. नि. साखरकर)

अवर सचिव

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा , आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई
५) निवडनस्ती (आरोग्य-७)